## निवडक

### माऊली देवस्थानच्या वर्धापन दिननिमित्त ‘शतचंडी महोत्सवास प्रारंभ



■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ८ :** मेणकुरे येथे श्री देवी माऊली पंचायतनच्या सतराव्या वाढदिवसा निमित्त यंदा श्री चरणी शतचंडी महोत्सव फाल्गून अष्टमी दि. ७ ते १२ रोजीपर्यंत विविध कार्यक्रमानुसार श्री वेद शास्त्र संपन्न शांताराम वामन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

शनिवार ८ रोजी विविध धार्मिक विधी व संध्याकाळी दीपोत्सव कार्यक्रम, नंतर स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. रविवार दि. ९ रोजी देवपूजा, पाठ वाचन, कुमारी पूजन, क्षेत्रपाल पूजन, बलिदान, पूर्णाहुती, ब्राह्मण संभावना. दुपारी १ वाजता देवीची महा आरती, महागाऱ्हाणे व महाप्रसाद. रात्री ८ वाजता देवीची महाआरती, रात्री १० वाजता श्री शं. ना. नवरे लिखित अमर कोनाडकर दिग्दर्शीत सामाजिक ‘सूर राहू दे’ नाटक सादर केले जाणार. या नाट्य प्रयोगाचे सादर कर्ते/निर्मिती/पुरस्कर्ते – मेणकुरे वेल्फेअर असोसिएशन व डॉ. चंद्रकांत पुंडलिक शेट्ये, आमदार डिचोली मतदार संघ. सोमवार दि. १० रोजी सकाळी ८ वाजता श्री देवीच्या पालखीची गावातून मिरवणूक. रात्री ८ वाजता श्री देवीची महा आरती, रात्री ९ वाजता पावणी चा कार्यक्रम तत्पूर्वी सरकारी माध्यमिक विद्यालय – मेणकुरे तील दहावी परीक्षे मध्ये पहिल्या तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा तसेच गत वर्षी पहिल्या तीन पावणी धारकांचा सत्कार सोहळा देवस्थान कमिटी तर्फे करण्यात येईल. मंगळवार दि. ११ रोजी संध्याकाळी ३.३० वाजता यंदाचे पलटदार परब कुटुंबीयातर्फे श्री सत्यनारायण महापूजा, रात्री ८ वाजता श्री देवीची महाआरत , रात्री १० वाजता ॐ कला सांस्कृतिक केंद्र– हळर्ण पेडणे गोवाद्वारा मकरंद परब, दिग्दर्शीत ‘निष्पाप’ नाट्य प्रयोग सादर करण्यात येईल. नाटकाचे पुरस्कर्ते मोहन परब, सुभाष परब व सिद्धेश परब, सह पुरस्कर्ते हळर्ण पंचक्रोशी हायस्कूल व्यवस्थापक फटी पुरुषोत्तम परब. बुधवार दि. १२ रात्री ८ वाजता श्री देवीची महाआरती. रात्री १० वाजता नंदिनी प्रॉडकशन सविनय प्रस्तुत नाट्य प्रयोग ‘घडलंय बिघडलय’ पुरस्कर्ते मेणकुरे फ्रेंड्स सर्कल असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे देवस्थान कमिटीने प्रसिद्ध केले आहे.

### गोमंतक भंडारी समाजातर्फे आज अखिल गोवा वधू वर मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८ :** गोमंतक भंडारी समाजाच्या केंद्रीय समितीतर्फे रविवार दि. ९ रोजी पर्वरी येथील गाडगे महाराज सभागृहात अखिल गोवा वधू वर मेळावा घेतला जाणार आहे. यासाठी आतापर्यंत ३५६ वधू वरांची नोंदणी झाली आहे. मेळाव्याचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता केंद्रिय नव ऊर्जा खात्याचे मंत्री श्रीपाद नाईकयांच्या हस्ते होईल. यावेळी सन्माननीय पाहुणे म्हणून जलस्त्रोत मंत्री सुभाष शिरोडकर, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दामोदर (दामू) नाईक व इतर मान्यवर उपस्थित असतील. भंडारी समाजातील उपवर मुला मुलींची योग्य स्थळे जुळून यावीत यासाठी दर दोन वर्षानी असा मेळावा घडवून आणला जातो, असे केंद्रीय समितीचे अध्यक्ष देवानंद नाईक यांनी सांगितले. वधू वर व त्यांच्या पालकांनी वेळेत हजर राहून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



मांद्रे : विजेत्यांना बक्षीस देताना गणेश शेटगावकर मुख्याध्यापक दिलीप मेथर.

### मांद्रे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ८ :** विद्या प्रसारक हायस्कूल, मोरजी येथे नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन, न्यू दिल्ली यांच्या सहकार्याने व गोवा स्टेट कौन्सिल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी सालीगाव गोवा तसेच विद्या प्रसारक हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये मांद्रे हायस्कूल मांद्रेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत आपली चमक दाखवली. विज्ञान उपक्रम स्पर्धेत मुस्कान सैनी व साईदीप कांबळी यांना द्रितीय पारितोषिक,प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्राजक्ता नाईक हिला प्रथम पारितोषिक व निबंध स्पर्धेत सिया गडेकर हिला प्रथम पारितोषिक मिळाले. शाळेच्या विज्ञान विषयाच्या शिक्षिका अनुपा देसाई, वर्षा पार्सेकर व प्रयोगशाळा सहायिका दीक्षा जोशी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाचे संस्थेचे चेअरमन केशव मांद्रेकर व मुख्याध्यापिका सौ.अपर्णा प्रभू यांनी कौतुक केले आहे.

# रोहितसेना जेतेपदासाठी सज्ज

## न्यूझीलंडविरूद्ध आज महामुकाबला | विराट, गिल, रोहितवर असणार मदार

**दुबई, दि. ८ :**

भारत आणि न्यूझीलंडमध्ये उद्या रविवारी दुपारी २.३० वाजता दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना रंगणार आहे. या सामन्यात स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिलेला रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ २५ वर्षांच्या बदला घेऊन उद्याचा सामना जिंकून जेतेपद पटकाविण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. तर दुसरीकडे, न्यूझीलंडचा संघ साखळी फेरीतील पराभवाचा बदला घेत उद्याचा सामना जिंकून आयसीसीचा चॅम्पियन्स बनण्याचा प्रयत्न करेल.



भारतीय संघाची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी राहिली आहे. संघाने पहिले दोन्ही सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. तर त्यानंतर शेवटच्या साखळी सामन्यात न्यूझीलंडला हरवले आणि उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला पराभूत करून अंतिम फेरीत शानदार प्रवेश केला. त्यामुळे आता अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा पराभव करून पुन्हा एकदा चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरण्याची भारतीय संघाला संधी आहे.

भारत आणि न्यूझीलंड याआधी ग्रुप स्टेजमध्ये एकदाच आमनेसामने आले आहेत, जिथे भारताने ४४ धावांनी विजय मिळवला आहे. यानंतर भारतीय संघाने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला पराभूत करून आपला उत्कृष्ट फॉर्म दाखवला. ग्रुप स्टेजमध्ये भारताकडून झालेल्या पराभवानंतर न्यूझीलंडने जोरदार पुनरागमन केले. उपांत्य फेरीत, कर्णधार मिचेल सँटनरच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ५० धावांनी शानदार विजय नोंदवला.

न्यूझीलंड संघानेही चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. न्यूझीलंडने साखळी सामन्यांमध्ये पाकिस्तान आणि बांगलादेशचा पराभव केला. यानंतर उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत अंतिम सामन्यात धडक मारली. त्यामुळे आता अंतिम सामन्यात भारताचा पराभव करून न्यूझीलंड संघ आपल्या पराभवाचा बदला घेऊ शकते. त्यामुळे या सामन्यावर क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे. भारत तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्यासाठी उत्सुक असेल. तर न्यूझीलंड संघ आपला दुसरा कप जिंकण्याचा प्रयत्न करेल. २०१९ च्या विश्वचषक फायनलमध्ये सामना बरोबरीत असूनही न्यूझीलंडला शेवटचा पराभव स्वीकारावा लागला होता.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

भारत : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, केएल राहुल (विकेटकीपर), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, हर्षित राणा, मोहम्मद शमी, कुलदीप यादव, ऋषभ पंत, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती आणि अर्शदीप सिंग.

**न्यूझीलंड :** मिचेल सँटनर (कर्णधार), विल यंग, डेव्हॉन कॉन्वे, केन विल्यमसन, रचिन रवींद्र, टॉम लॅथम (विकेटकीपर), ग्लेन फिलिप्स, मायकेल ब्रेसवेल, मॅट हेन्री, कायल जेमिसन, विल्यम ओरुर्के, डॅरिल मिशेल, नॅथन स्मिथ, मार्क चॅपमन आणि जेकब डफी.

### विराट कोहली फॉर्ममध्ये

**विराट कोहली सध्या सुरू असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ दरम्यान फॉर्ममध्ये आहे. चार डावांमध्ये त्याने ७२.३३ च्या सरासरीने आणि ८३.१४ च्या स्ट्राईक रेटने २१७ धावा केल्या आहेत. त्याने पाकिस्तानविरुद्ध शतक आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना जिंकणारी ८४ धावा करत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचा सर्वाधिक धावा करणारा आणि स्पर्धेत चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही ठरला आहे.**

### सलामीवीरांच्या कामगिरीकडे लक्ष

**शर्मा आणि गिल या दोन्ही खेळाडूंच्या कामगिरीकडे बघितले तर, चांगल्या सुरुवात दिल्यानंतर या दोघांकडून गेल्या २–३ सामन्यात काही फार जास्त धावा झाल्या नाहीत. शुबमन गिलने पहिल्याच सामन्यात शानदार शतक झळकावले होते, तर रोहितनेही त्या सामन्यात जोरदार फटकेबाजी करत ४१ धावा केल्या होत्या. मात्र, त्यानंतर या दोघांकडून एकही मोठी खेळी साकारण्यास यश आले नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत हे दोघेही लवकर आपली विकेट देऊन बसले होते. अशा स्थितीत आता विजेतेपदाच्या सामन्यात रोहित आणि गिल यांच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा आहे.**

# विद्या प्रबोधिनी महाविद्यालयात ‘नैसर्गिक रंग’ कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८ :** पर्वरी विद्या प्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स, एज्युकेशन, कॉम्प्युटर आणि मॅनेजमेंट, मधील निसर्ग क्लब आणि गोवा राज्य जैवविविधता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक रंग कार्यशाळेचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक रंगांचा वापर प्रोत्साहित करून टिकाऊपणा आणि पर्यावरण जागरूकता वाढवणे हा होता.



पर्वरी : विद्या प्रबोधिनी महाविद्याल व गोवा राज्य जैवविविधता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक रंग कार्यशाळेत सहभागी मार्गदर्शक व विद्यार्थी.

कार्यशाळेची सुरुवात उपप्राचार्य डॉ. उज्वला हाणजुकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी शाश्वत जीवनशैली अंगीकारण्याच्या गरजेवर भर दिला.

कार्यशाळेसाठी मानसवी औखाळे यांनी प्रमुख संसाधन व्यक्तीची ओळख करून दिली. यानंतर सूर्यकांत गावकर यांनी मुख्य सत्र घेतले. नैसर्गिक रंगनिर्मिती तज्ञ असलेल्या श्री. गावकर यांनी हळद, बीट, पालक आणि जास्वंद यांसारख्या सेंद्रिय घटकांचा वापर करून रंग कसा तयार करावा याचे प्रात्यक्षिक दिले. तसेच, त्यांनी रासायनिक रंगांचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम आणि नैसर्गिक रंगांकडे वळण्याची गरज यावर प्रकाश टाकला.

विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला आणि तयार केलेले नैसर्गिक रंग विविध हितधारकांना वितरित करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, जो तरुणांमध्ये टिकाऊ जीवनशैलीविषयी वाढत्या उत्सुकतेचे प्रतीक होते.

गोवा राज्य जैवविविधता मंडळ, प्रमुख संसाधन व्यक्ती, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.सदर कार्यशाळा विद्या प्रभोधिनी कॉलेजच्या सर्वसमावेशक शिक्षण आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या दृष्टिकोनाशी सुसंगत ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेल्वी रॉड्रिग्स यांनी केले. या कार्यक्रमाचे समन्वयक सहाय्यक प्राध्यापक डॉ. उद्धव पोळ व रुद्रेश म्हामल होते. श्रुती चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.

कॉलेज व्यवस्थापन भविष्यातही अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करून सर्जनशीलता, टिकाऊपणा आणि पर्यावरण जागरूकता वृद्धिंगत करण्यास उत्सुक आहे.

# गुजरात जायंट्सने चौथा विजय नोंदवला

## दिल्ली कॅपिटल्सचा ५ विकेट्सनी पराभव : हरलीन देओलचे अर्धशतक : मेघना सिंगने ३ विकेट्स घेतल्या

**लखनऊ, दि. ८ :**

गुजरात जायंट्सने महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)च्या सीझन ३ मध्ये त्यांचा चौथा विजय नोंदवला. शुक्रवारी संघाने दिल्ली कॅपिटल्सचा ५ विकेट्सने पराभव केला.



लखनौच्या एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने ५ विकेट गमावून १७७ धावा केल्या. गुजरात टायटन्सने ३ चेंडू शिल्लक असताना ५ विकेट गमावून १७८ धावा करून लक्ष्य गाठले.

गुजरातची फलंदाज हरलीन देओलने ७० धावांची सामना जिंकणारी खेळी खेळली. या विजयासह, गुजरात जायंट्स पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचले आहे. पराभवानंतरही दिल्ली कॅपिटल्स १० गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, दिल्ली कॅपिटल्सने चांगली सुरुवात केली, कर्णधार मेग लॅनिंग आणि शेफाली वर्मा यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघींमध्ये पहिल्या विकेटसाठी ५४ चेंडूत ८३ धावांची भागीदारी झाली. मेधना सिंगच्या चेंडूवर शेफाली वर्मा बाद झाली. तिने २७ चेंडूत ४० धावा केल्या. शेफाली बाद झाल्यानंतर एका बाजूला विकेट पडत राहिल्या. दरम्यान, मेग लॅनिंगने तिचा वेगवान डाव सुरूच ठेवला. तिने ५७ चेंडूत ९२ धावा केल्या. या डावात तिने १५ चौकार आणि १ षटकार मारला.

गुजरातची सुरुवात खराब झाली, हरलीन देओल आणि बेथ मुनी यांनी घेतली जबाबदारी

१७८ धावांचा पाठलाग करताना गुजरात जायंट्सने ४ धावांवर पहिली विकेट गमावली. गुजरातकडून शिखा पांडेने सलामीवीर दयालन हेमलताला बाद करून पहिली विकेट घेतली. यानंतर, हरलीन देओलने बेथ मुनीसह डावाची जबाबदारी घेतली. दुसऱ्या विकेटसाठी दोघांनी ५७ चेंडूत ८५ धावांची भागीदारी केली. मिन्नू मनीने बेथ मूनीला बाद केले. मुनीने ३५ चेंडूत ४४ धावा केल्या. यानंतर, हरलीनने कर्णधार ॲश गार्डनरसोबत तिसऱ्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी केली.

गार्डनर १३ चेंडूत २२ धावा काढून बाद झाली, या डावात तिने २ षटकार आणि १ चौकार मारला. यानंतर, डिएंड्रा डॉटिनने १० चेंडूत २४ धावा केल्या. जेस जोनासनने डॉटिनला बाद केले. फोबी लिचफिल्ड पहिल्याच चेंडूवर बाद झाली.

त्यावेळी गुजरात जायंट्सला १२ चेंडूत १६ धावांची आवश्यकता होती, विजय जवळ येत होता पण १९ व्या षटकातील पहिल्या ५ चेंडूत शिखा पांडेने फक्त ३ धावा दिल्या, पण या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर काश्वी गौतमने षटकार मारला आणि पुन्हा एकदा रंगत बदलली. शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर हरलीन देओलने चौकार मारून गुजरातचा विजय निश्चित केला आणि तिसऱ्या चेंडूवर काशवी गौतमने विजयी धाव घेतली.

# भारतीय अन्न संस्कृती श्रेष्ठ : अमिता सलत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८:** खांडोळा सरकारी कॉलेज वाणिज्य शाखेच्या पोस्ट ग्रॅज्यूएट डिपार्टमेंटतर्फे एमकॉम भाग – २ च्या विद्यार्थ्यांसाठी अलिकडेच ‘भारतीय अन्न संस्कृतीचे महत्त्व’ या विषयावर एक व्याख्यान आयोजित करण्यात आले. रुचीक फेम अमिता नायक सलत्री यांनी या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना उपयुक्त असे मार्गदर्श केले.





**खांडोळा : विद्यार्थिनी संतोषी सावंत अमिता नायक सलत्री यांचे फुल देऊन स्वागत करताना. बाजूला प्रोफेसर डॉ. एस. व्ही. सुखटणकर व प्रो. निवेदा गावस.**

अमिता सलत्री म्हणाल्या की, अन्न संस्कार, अन्न देवता हे शब्द केवळ आपल्या भारती संस्कृतीतच पाळले जातात. शाकाहार हीच आपली भारती अन्न संस्कृती, ज्याचे अनुकरण आज विदेशी लोक करत आहेत. ज्यारी, नाचणी, बाजरी यासर्व भरडधान्यांचा आपल्या आहारात पूर्वापार काळापासून समावेश केला जात आहे. ज्यामुळे उन्हातान्हात कष्टाची कामे करण्याची उर्जा ताकद कामगार वर्गांना मिळत असले. आपल्या गोव्यात सुद्ध पूर्वापार काळापासून पौष्टिक अशा उकड्या तांदळाचा समावेश सकाळी उठल्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत केला जातो, असे सांगून आपली भारतीय अन्न संस्कृती कळी सर्वश्रेष्ठ आहे. यावर त्यांनी कित्येक उदाहरणासहीत माहिती दिली.

यावेळी वरील कॉलेडटे पोष्ट ग्रॅज्युएट डिपार्टमेंटचे उपप्राचार्य आणि असोशिएट प्रोफेसर डॉ. एस. व्ही. सुखटणकर, तसेट वाणिज्य शाखेची प्राध्यापिका निवेदा गावस उपस्थित होत्या. प्रारंभी विद्यार्थिनी दिया प्रियोळकर यांनी सलत्री यांचा परिचय करून दिला. ज्योत्स्ना फडते यांनी आभार प्रदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांनी यावरील मार्गदर्शनावर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करून सलत्री यांची आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 185 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .